# अ‍ॅग्रोमेट अ‍ॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २६.०७.२०२४**

**जिल्हा : सातारा**

| मागील आठवड्यातील हवामान (२०.०७.२०२४ ते २६.०७.२०२४) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (२७.०७.२०२४ ते ३१.०७.२०२४) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | दिनांक | २७ | २८ | २९ | ३० | ३१ |
| - | - | - | - | - | - | - | पाऊस (मिमी) | ५२ | ४५ | २५ | २० | २१ |
| - | - | - | - | - | - | - | कमाल तापमान (अं.से.) | २८ | २९ | ३० | ३१ | ३२ |
| - | - | - | - | - | - | - | किमान तापमान (अं.से.) | २३ | २३ | २४ | २४ | २५ |
| - | - | - | - | - | - | - | ढग स्थिती (आकाश) | ८ | ८ | ८ | ८ | ८ |
| - | - | - | - | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ९३ | ८८ | ८७ | ८७ | ८६ |
| - | - | - | - | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ८० | ७९ | ७९ | ७८ | ७८ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | २९ | २९ | २६ | २३ | २३ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | प.नै. | प.नै. | प.नै. | प.नै. | प.नै. |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार सातारा जिल्ह्यामध्ये दिनांक २७ ते ३१ जुलै दरम्यान आकाश ढगाळ राहण्याची शक्यता आहे. सातारा जिल्ह्यामध्ये दिनांक २७, २८, २९, ३० व ३१ जुलै रोजी बऱ्याच ठिकाणी मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. सातारा जिल्ह्यामध्ये ३१ जुलै पर्यंत कमाल तापमान २८ ते ३२ अंश सेल्सिअस दरम्यान तर किमान तापमान २३.० ते २५.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ८६ ते ९३% या दरम्यान तर दुपारची सापेक्ष आद्रता ७८ ते ८०% दरम्यान रहण्याची शक्यता आहे. वाऱ्याचा वेग ताशी २३ ते २९ कि.मी. दरम्यान राहण्याची शक्यता आहे.<br>विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक ३१ जुलै ते ६ ऑगस्ट दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी दरम्यान तसेच कमाल तापमान व किमान तापमान सरासरी दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| हवामान ईशारा | | ➢ सातारा जिल्ह्यांमध्ये घाट भागात दिनांक २६ जुलै रोजी तुरळक ठिकाणी जोरदार ते खूप जोरदार स्वरूपाच्या पावसाची तर तुरळक ठिकाणी अत्यंत जोरदार स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे.<br>➢ सातारा जिल्ह्यांमध्ये घाट भागात दिनांक २७ जुलै रोजी तुरळक ठिकाणी जोरदार ते खूप जोरदार स्वरूपाच्या पावसाची तर तुरळक ठिकाणी अत्यंत जोरदार स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे.<br>➢ सातारा जिल्ह्यांमध्ये घाट भागात दिनांक २८ जुलै रोजी तुरळक ठिकाणी जोरदार ते खूप जोरदार स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे.<br>➢ सातारा जिल्ह्यांमध्ये घाट भागात दिनांक २९ व ३० जुलै रोजी तुरळक ठिकाणी जोरदार स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | ❖ जिल्ह्यामध्ये घाट भागात जोरदार पावसाची शक्यता असल्याने शेतामध्ये पावसाच्या साठणाऱ्या पाण्याचा निचरा होईल याची व्यवस्था करावी.<br>❖ शेतकरी बांधवांनी हवामान आधारित शेतीविषयक सल्ला आपल्या अँड्रॉइड मोबईलवर मिळविण्यासाठी गुगल प्ले स्टोअर वरून " मेघदूत" अँड्रॉइड अ‍ॅप्लिकेशन तर मेघगर्जना व विजांचा कडकडाट इ.च्या अंदाजासाठी "दामिनी" अँड्रॉइड अ‍ॅप्लिकेशन डाउनलोड करावे व त्याचा वापर करावा.<br>❖ मेघदूत अ‍ॅप डाउनलोड करण्यासाठी लिंक : https://play.google.com/store/apps/details?id=com.aas.meghdoot<br>❖ दामिनी अ‍ॅप डाउनलोड करण्यासाठी लिंक : https://play.google.com/store/apps/details?id=com.lightening.live.damini |
| संदेश | | ❖ घाट भागात जोरदार ते खूप जोरदार स्वरुपाच्या पावसाची शक्यता असल्याने शेतकरी बांधवांनी जनावरे सुरक्षित ठिकाणी ठेवावीत. शेतकरी बांधवांनी स्वत:ची व आपल्या पशुधनाची काळजी घ्यावी. |
| भात | वाढीची अवस्था | ➢ सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर, पाटण, जावली व सातारा या तालुक्यांसाठी (घाट भागासाठी) दिनांक २६ व २७ जुलै रोजी जोरदार ते खूप जोरदार स्वरुपाच्या तसेच तुरळक ठिकाणी अत्यंत जोरदार स्वरुपाच्या पावसाचा इशारा देण्यात आलेला असल्याने शेतकरी बांधवांनी भात लावणी तसेच शेतातील आंतरमशागतीची कामे इशारा कालावधी दरम्यान करणे टाळावे.<br>➢ घाट भागात जोरदार ते खूप जोरदार पावसाची शक्यता असल्याने शेतामध्ये पावसाच्या साठणाऱ्या पाण्याचा निचरा होईल याची व्यवस्था करावी.<br>➢ भात पिकाच्या वाढीच्या अवस्थेनुसार भात खाचरातील पाण्याची पातळी रोप लागणीपासून रोपे स्थिर होईपर्यंत १ ते २ से.मी तर रोपांच्या वाढीच्याअवस्थेत २ ते ३ से.मी. ठेवावी. |
| मका | वाढीची अवस्था | ➢ शक्य असल्यास गरजेनुसार कोळपणी व नंतर खुरपणी करून शेत तणमुक्त ठेवावे.<br>➢ घाट भागात जोरदार स्वरुपाच्या पावसाची शक्यता असल्याने शेतामध्ये पावसाच्या साठनाऱ्या पाण्याचा निचरा करावा. |
| सोयाबीन | वाढीची अवस्था | ➢ शक्य असल्यास पीक उगवणीनंतर १५ ते २० दिवसांनी एक कोळपणी व नंतर खुरपणी करून शेत तणमुक्त ठेवावे.<br>➢ ढगाळ हवामान व हलक्या स्वरुपाच्या पावसामुळे काही ठिकाणी स्पोडोप्टेरा या पाने खाणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. प्रादुर्भाव दिसून येताच अळीच्या नियंत्रणासाठी एक हेक्टर पिकात ५ कामगंध सापळे लावावेत.<br>➢ पावसाची शक्यता असल्याने शेतामध्ये पावसाच्या साठनाऱ्या पाण्याचा निचरा करावा. |
| भुईमूग | वाढीची | ➢ शक्य असल्यास १० ते १२ दिवसांच्या अंतराने २ ते ३ कोळपण्या कराव्यात व २ खुरपण्या कराव्यात. शेवटची खुरपणी थोडी खोल |

# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर
## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**

| | | |
|---|---|---|
| | अवस्था | द्यावी त्यामुळे पिकास मातीची भर मिळते. भुईमूगच्या आऱ्या जमिनीत जाण्यास सुरुवात झाल्यावर आंतरमशागत करू नये.<br>➢ पावसाची शक्यता असल्याने शेतामध्ये पावसाच्या साठनाऱ्या पाण्याचा निचरा करावा. |
| वांगी | फळे वाढीची अवस्था | ➢ वांग्यावर शेंडे पोखरणारी अळी जास्त प्रमाणात दिसून येते. यामध्ये अळी प्रथमतः झाडावर फळे नसताना कोवळया शेंड्यात शिरुन आतील भाग खाते. त्यामुळे शेंडे वाळतात. नंतर फळे आल्यावर फळात शिरुन आतील भाग खाते. त्यामुळे अशा फळांना बाजारात किंमत मिळत नाही. या किडीमुळे फळांचे ४०-५० टक्के नुकसान होवू शकते. याच्या नियंत्रणासाठी लागवडीनंतर २० दिवसांनी दर आठवड्याला किडलेले शेंडे व फळे आढळल्यास ती गोळा करून नष्ट करावीत किंवा खोल खड्ड्यात पुरुन टाकावी.<br>➢ शेतामध्ये फळे पोखरणाऱ्या आळीच्या नियंत्रणासाठी एकरी ४० कामगंध सापळे (फनेल टाईप) लावावेत.<br>➢ पावसाची शक्यता असल्याने शेतामध्ये पावसाच्या साठनाऱ्या पाण्याचा निचरा करावा. |
| भेंडी | वाढीची अवस्था | ➢ ढगाळ हवामान व वाढलेली आद्रता यामुळे भेंडी पिकावर फळे पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. प्रादुर्भाव दिसून येताच ट्रायकोकार्ड १० प्रती हेक्टर या प्रमाणात वापरावे.<br>➢ पावसाची शक्यता असल्याने शेतामध्ये पावसाच्या साठनाऱ्या पाण्याचा निचरा करावा. |
| पशुधन | वाढीची | ➢ गोठे स्वच्छ व कोरडे ठेवावेत.<br>➢ पशुवैद्यकाच्या सल्ल्याने गोठयामध्ये निर्जंतुकीकरणासाठी चुन्याच्या द्रावणाचा सडा आठवड्यातून दोन वेळा टाकावा.<br>➢ शेतकरी बांधवांनी आपल्या पशुधनाची काळजी घ्यावी. घाट भागात जोरदार स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याने जनावरे सुरक्षित ठिकाणी ठेवावीत. |

स्त्रोत
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

ठिकाण : कोल्हापूर
दि. : २६.०७.२०२४

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा**
**सहयोगी संशोधन संचालक,**
**विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर**